# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक. :
०२०—२५६०१२६४
२५६०१२६५
ई—मेल:
**pldvp@unipune.ac.in**

गणेशखिंड, पुणे ४११००७
नियोजन व विकास विभाग


---

संदर्भ : साफुपुवि/निववि/७४८ दिनांक : ०३/०७/२०१८

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था.

विषय : वार्षिक अहवाल सन २०१७—१८ साठीची माहिती ऑनलाईन पध्दतीने पाठविणेबाबत. ( दि. १ जुलै २०१७ ते ३० जून २०१८ पर्यंत)

महोदय/महोदया,

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितास कळविण्यात येते की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून प्रतिवर्षी वार्षिक अहवाल तयार केला जातो. वार्षिक अहवालासाठी आवश्यक असणारी सन २०१७—१८ ची माहिती ऑनलाईन पध्दतीने पाठविणे अनिवार्य आहे. सदर वार्षिक अहवालामध्ये समाविष्ट असलेल्या माहितीचा उपयोग शासन स्तरावर वेगवेगळया कामाकरिता केला जातो. तसेच महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहामध्ये विहित कालावधीत सादर करावा लागतो व त्यास दोन्ही सभागृहाची मंजूरी घ्यावी लागते.

वार्षिक अहवालाची माहिती ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याचा कालावधी, मंगळवार दि. ०३ जुलै २०१८ ते गुरूवार दि. ०२ ऑगस्ट २०१८ पर्यंत निश्चित करण्यात आलेला आहे. त्यानंतर वार्षिक अहवाल भरण्यासाठी कोणत्याही प्रकारची मुदतवाढ मिळणार नाही. तसेच वार्षिक अहवाल माहिती भरल्याशिवाय गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत प्रस्ताव दाखल करता येणार नाहीत.

वार्षिक अहवालाकरीता आपणाकडून मागविण्यात आलेली माहिती ऑनलाईन पध्दतीने भरली नाही तर शासनाकडून आपणास मिळणारे अनुदान, इतर सवलती देण्याविषयी अडचणी निर्माण होतील. **यासंदर्भात मा. व्यवस्थापन परिषदेच्या ठराव क्र. २४५/१२०९१२ अन्वये विद्यापीठ कार्यालयाने वेळोवेळी मागणी केलेली माहिती न देणे ही गंभीर बाब असल्याने, मागविलेली माहिती वेळेत भरणे अपेक्षित आहे.**

वार्षिक अहवालाची माहिती सादर करताना ऑनलाईन पध्दतीने भरलेल्या माहितीची एक हार्ड कॉपी नियोजन व विकास विभागास सादर करणे बंधनकारक राहील.

ऑनलाईन पध्दतीने माहिती सादर करण्याची लिंक खालील प्रमाणे

**unipune.ac.in – Home page - BOD Online – Login – For Users – Login & Password – Annual Report 2017-18**

कळावे,

उपकुलसचिव
नियोजन व विकास

प्रत — १. मा.कुलगुरु, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे ७.
२. मा. प्र—कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे ७.